जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 4 JUL 2021
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या ७,२०० विद्यार्थ्यांनी दिली ऑनलाईन पुनर्परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित पुनर्परीक्षेंतर्गत शनिवारी ८ हजार ७२०७ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली.

विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० च्या परीक्षा २२ मार्चपासून सुरू झाल्या होत्या. परंतु ऑफलाईन पर्याय निवडलेले विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिले होते. त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून विद्यापीठ प्रशासनाने संबंधित विद्यार्थ्यांच्या पुनर्परीक्षा ३० जूनपासून सुरू केल्या आहेत.

३ जुलै रोजी बीए., बी.कॉम., बी.एस्सी., एम.ए., एम.कॉम., बीबीए, बीसीए, एमसीए, एमएसडब्ल्यू, बी.व्होक, बी.एस्सी., एम.एस्सी नॅनो सायन्स, एमबीए इन रुरल मॅनेजमेंट, जर्नालिझम अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUL 2021
पुढारी

# पदवी, डिप्लोमा, अभियांत्रिकीच्या १० ऑगस्टपासून ऑनलाईन परीक्षा

## वेळापत्रक जाहीर; २ लाख ५० हजार विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील मार्च-एप्रिलमधील उन्हाळी सत्रातील पदवी स्तरावरील पारंपरिक अभ्यासक्रमाच्या (प्रथम वर्ष, प्रथम व द्वितीय सत्र) महाविद्यालय स्तरावरील परीक्षा, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र यासह डिप्लोमा अभ्यासक्रमाच्या परीक्षा १० ऑगस्टपासून ऑनलाईन पद्धतीने सुरू होणार आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे २ लाख ५० हजार विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत.

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार ऑनलाईन स्वरुपात ५० गुणांची परीक्षा घेण्यात येणार आहे. 'एमसीक्यू' पद्धतीने घेण्यात येणाऱ्या या परीक्षेचा कालावधी १ तास असणार आहे. ज्या-त्या अभ्यास मंडळाने निश्चित केलेल्या अभ्यासक्रमावर प्रश्नपत्रिका तयार करण्यात येणार आहे. वेळापत्रक तयार करणे, प्रसिद्ध करणे, प्रश्नपत्रिका तयार करणे व परीक्षेचे संपूर्ण नियोजन शैक्षणिक संस्थाकडे सोपविले आहे. कोरोना नियमांचे पालन करण्यात यावे, अशा सूचना परीक्षा विभागाने दिल्या आहेत.

औषधनिर्माणशास्त्र, विधी, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, वास्तुनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या पदवी, पदव्युतर विद्यार्थ्यांच्या सर्व परीक्षा महाविद्यालयांच्या सहकार्याने १० ऑगस्ट ते १० सप्टेंबर या काळात ऑनलाईन क्लस्टर पद्धतीने घेण्यात येणार आहेत. संलग्नित महाविद्यालयांनी परीक्षेकरिता विद्यापीठाकडून निश्चित केलेल्या समन्वयक महाविद्यालयाची संपर्क साधून परीक्षा कामकाज पाहणारे महाविद्यालयातील समन्वयकाचे नाव, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी आदी माहिती समन्वयक महाविद्यालयांना देणे बंधनकारक आहे. समन्वयक महाविद्यालयांची यादी विद्यापीठाने जाहीर केली आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

### अडचणी आल्यास विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा

डिप्लोमा, पी.जी डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्स आदी अभ्यासक्रमाच्या सर्व परीक्षादेखील १० ऑगस्टपासून महाविद्यालय, अधिविभाग स्तरावर ऑनलाईन पद्धतीने सुरु होणार आहेत. ऑनलाईन परीक्षा देताना अडचणी आल्यास विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा संबंधित महाविद्यालय, क्लस्टरमार्फत तत्काळ घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUL 2021
पुढारी

# एम.फिल.,प्री-पीएच.डी. कोर्स वर्कच्या १० ऑगस्टपासून ऑनलाईन परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील मार्च-एप्रिल २०२१ उन्हाळी सत्रातील परीक्षा १० ऑगस्टपासून सुरू होत आहेत. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार एम.फिल., प्री-पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षा कोव्हिड १९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालय, अधिविभागस्तरावर ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात येणार आहेत. एम.फिल., प्री-पीएच.डी कोर्स वर्क परीक्षा ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत. परीक्षेचे संचलन, पर्यवेक्षनाची जबाबदारी संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिविभागप्रमुख यांच्यावर सोपविण्यात आल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUL 2021
सकाळ

# मुंबई विद्यापीठ अभ्यासक्रमात 'फेसाटी'



नवनाथ गोरे

**सांगली :** २०१८ चा साहित्य अकादमीचा युवा पुरस्कारप्राप्त कादंबरी 'फेसाटी' आता मुंबई विद्यापीठाच्या 'बीए- २'च्या मराठी अभ्यासक्रमात समाविष्ट केली आहे. मूळचे सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील निगडी खुर्द गावचे रहिवासी असलेले लेखक नवनाथ गोरे यांच्या या कादंबरीचा यापूर्वीच जळगाव आणि नांदेड विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समावेश केला आहे. यानिमित्ताने सांगलीच्या मातीतील साहित्यिकाचा गौरव झाला आहे. दुष्काळी जत तालुक्यातील दाहकता मांडणारी 'फेसाटी' ही गोरे यांची आत्मकथनात्मक कादंबरी असली, तरी समस्त दुष्काळी भागातील तरुणाईची ससेहोलपट मांडणारी आहे. साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार मिळाल्याने गोरे प्रसिद्धीच्या झोतात आले.

04 JUL 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एम. फिल., पीएच. डी. सह सर्व परीक्षा १० ऑगस्टपासून

## पारंपारिक आणि व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन परीक्षा वस्तुनिष्ठ पध्दतीने

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०–२१ या शैक्षणिक वर्षातील मार्च–एप्रिल २०२१ च्या सर्व परीक्षा १० ऑगस्टपासून सुरु होणार आहेत. यामध्ये एम. फिल., पीएच. डी. पदवी पारंपारिक अभ्यासक्रम प्रथम व व्दितीय वर्ष, औषधनिर्माणशास्त्र, विधी, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, वास्तुनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी यासह अन्य विषयांचा समावेश आहे. यासंदर्भातील माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.



कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व परीक्षा ऑनलाईन होणार आहेत. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार परीक्षा वस्तुनिष्ठ पध्दतीने असल्याने ५० गुणांसाठी २५ प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नाला दोन गुण दिले जाणार आहेत. ऑनलाईन परीक्षा देण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा अर्ज भरताना आपला ई–मेल आयडी, मोबाईल नंबर अपडेट करावयाचा आहे. पदवीसह व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा त्या त्या महाविद्यालयात घ्यावयाच्या आहेत. परीक्षेसंदर्भातील सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**पीएच. डी. परीक्षा डिस्क्रीप्टीव्ह पध्दतीने**

एम. फिल., पीएच. डी. परीक्षा ऑनलाईन पध्दतीनेच परंतू वर्णणात्मक (डिस्क्रीप्टीव्ह) पध्दतीने होणार आहे. पुर्वीप्रमाणे प्रश्नपत्रिकेचे स्वरूप अभ्यासक्रम निहाय राहणार आहे. परीक्षेचे कामकाज, पर्यवेक्षण, आदी परीक्षेची कामे महाविद्यालय, अधिविभाग, संचालक यांनी करावयाचे आहे. कोरोनाच्या नियमांचे पालन करीत या परीक्षा घ्यावयाच्या आहेत.